सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १३ फेब्रुवारी २०१७.

**प्रचार कालावधी समाप्तीनंतर प्रचारविषयक जाहिरातींवर बंदी**

१४ फेब्रुवारीनंतर जनमत व मतदानोत्तर चाचण्यांवर निर्बंध

मुंबई, दि. १३: महानगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर राजकीय पक्ष व उमेदवारांना मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांत प्रचारविषयक जाहिराती प्रसिद्ध करता येणार नाहीत; त्याचबरोबर १४ फेब्रुवारी २०१७ रोजी रात्री बारा वाजल्यापासून ते २१ फेब्रुवारी २०१७ रोजी मतदान समाप्तीपर्यंत जनमत (ओपिनियन पोल) व मतदानोत्तर (एक्झिट पोल) चाचण्यांचे निष्कर्ष प्रसिद्ध करण्यावर बंदी राहील, असे राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे सांगितले.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाच वेगवेगळ्या कायद्यांतील तरतुदीनुसार घेतल्या जातात. त्यानुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा प्रचार मतदान सुरु होण्याच्या दिनांकापूर्वी २४ तास अगोदर बंद होतो. त्यामुळे पहिल्या टप्पात १६ फेब्रुवारी २०१७ रोजी मतदान होत असलेल्या १५ जिल्हा परिषदा व १६५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा जाहीर प्रचार १४ फेब्रुवारी २०१७ रोजी रात्री १२ वाजता संपेल. दुसऱ्या टप्प्यात २१ फेब्रुवारी २०१७ रोजी मतदान होत असलेल्या ११ जिल्हा परिषदा व ११८ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा जाहीर प्रचार १९ फेब्रुवारी २०१७ रोजी रात्री १२ वाजता संपेल; परंतु ध्वनिक्षेपाबाबतच्या विहित आदेशांचेही पालन करणे आवश्यक राहील.

महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर बंद होतो. त्यामुळे २१ फेब्रुवारी २०१७ रोजी मतदान होणाऱ्या १० महानगरपालिकांचा जाहीर प्रचार १९ फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपेल. जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर आयोगाच्या १४ ऑक्टोबर २०१६ च्या आदेशानुसार राजकीय पक्ष किंवा उमेदवारांना मुद्रित अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रचाराच्या जाहिराती प्रसिद्ध करता येणार नाहीत. यात सोशल मीडियाचाही समावेश असेल.

मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांतील जाहिरातींबाबत समान नियमन असावे, अशी मागणी काही राजकीय पक्षांकडूनदेखील करण्यात आली होती, असे नमूद करून श्री. सहारिया म्हणाले की, १४ फेब्रुवारी २०१७ रोजी रात्री बारापासून ते २१ फेब्रुवारी २०१७ रोजी मतदान समाप्तीपर्यंत कुठल्याही माध्यमांद्वारे जनमत (ओपिनियन पोल) व मतदानोत्तर (एक्झिट पोल) चाचण्यांचे निष्कर्ष प्रसिद्ध करण्यावर बंदी राहील. या निवडणुकांचे दोन्ही टप्पे पाठोपाठ असल्याने मतदारांवर पडणारा संभाव्य प्रभाव लक्षात घेऊन, हे स्पष्टीकरण करण्यात आले असल्याचे श्री. सहारिया यांनी सांगितले.

- १६ फेब्रुवारी २०१७ च्या जि. प. व पं. स. मतदानासाठी प्रचार समाप्ती- १४ फेब्रुवारी रोजी रात्री १२ पासून
- २१ फेब्रुवारी २०१७ च्या जि. प. व पं. स. मतदानासाठी प्रचार समाप्ती- १९ फेब्रुवारी रोजी रात्री १२ पासून
- २१ फेब्रुवारी २०१७ च्या महानगरपालिका मतदानासाठी प्रचार समाप्ती- १९ फेब्रुवारी रोजी सायं. ५.३० पासून
- जनमत व मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्ष प्रसिद्ध करण्यावर निर्बंध- १४ फेब्रुवारी २०१७ रोजी रात्री १२.०० पासून

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)